# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र राज्य) भारत.

**ई-मेल :** fra.govmh@gmail.com
**संकेतस्थळ :** www.mahafra.org
**संपर्क :** ०२२-३१९८०३४८/८८२८७ ८६२६४

**जा.क्र.:शुनिप्रा/संकेतस्थळ सूचना/२०२५/1013.** **दिनांक : २५.०७.२०२५**

## फेर सूचना

**संदर्भ : दि.२०.०६.२०२५**

महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय / उच्च व तंत्र शिक्षण / विधी / कृषी या विभागांतर्गत प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली येणा-या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना या सूचनेद्वारे असे निदर्शनास आणून देण्यात येते की,

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील -

कलम १४ (४) नुसार प्रत्येक विनाअनुदानित संस्था, नियामक प्राधिकरणाने मान्यता दिलेले पाठयक्रमनिहाय शुल्क आपल्या सूचना फलकावर आणि आपल्या संकेतस्थळावर मराठी व इंग्रजीमध्ये प्रदर्शित करील, परंतु भाषिक अल्पसंख्यांक संस्थांच्या बाबतीत, अशी संस्था ज्या अल्पसंख्यांक भाषेशी संबंधित असेल त्या अल्पसंख्यांक भाषेतही ते शुल्क प्रदर्शित करील आणि ते विद्यार्थी व संस्था यांच्यावर बंधनकारक असेल.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेणा-या प्रवेशार्थींना त्यांचे शैक्षणिक शुल्क किती आहे याची माहिती सुलभ होण्याकरीता **संस्थेच्या संकेतस्थळावर पहिल्या पानावर (Front Page) सहज दिसेल अशा पध्दतीने प्रदर्शित करावे.**

उपरोक्त कलम १४ (४) नुसार आपल्या संस्थेचे प्राधिकरणाने निर्धारित केलेले शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे शुल्क, ज्यांचे शुल्क निर्धारण प्राधिकरणाने केले नसल्यास अशा संस्थांनी निर्धारित केल्यानंतर संस्थेच्या सूचना फलकावर आणि संकेतस्थळावर प्रदर्शित केल्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयात ३ दिवसांच्या आत सादर करावा. सदर मुदतीत अनुपालन अहवाल सादर न केल्यास कायद्याच्या कलम २० नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
महाराष्ट्र राज्य

डॉ.अर्जुन चिखले, भा.प्र.से
सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण
मुंबई

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

ई-मेल: fra.govmh@gmail.com
संकेतस्थळ: www.mahafra.org
दुरध्वनी: ०२२-३१९८०३४८ / मोबाईल क्र.८८२८७८६२६४


जा.क्र.:शुनिप्रा/नियंत्रण शाखा/०७७७/२०२५ दिनांक : २०.०६.२०२५

## सूचना

महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय / उच्च व तंत्र शिक्षण / विधी / कृषी या विभागांतर्गत प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली तसेच प्राधिकरणाच्या कक्षेत येणा-या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना या सूचनेद्वारे असे निदर्शनास आणून देण्यात येते की,

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील -

कलम १४ (च) (४) नुसार प्रत्येक विनाअनुदानित संस्था, नियामक प्राधिकरणाने मान्यता दिलेले पाठ्यक्रमनिहाय शुल्क आपल्या सूचना फलकावर आणि आपल्या संकेतस्थळावर मराठी व इंग्रजीमध्ये प्रदर्शित करील, परंतु भाषिक अल्पसंख्यांक संस्थांच्या बाबतीत, अशी संस्था ज्या अल्पसंख्यांक भाषेशी संबंधित असेल त्या अल्पसंख्यांक भाषेतही ते शुल्क प्रदर्शित करील आणि ते विद्यार्थी व संस्था यांच्यावर बंधनकारक असेल.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक शुल्क किती आहे याची माहिती सुलभ होण्याकरीता कायद्याच्या कलमांचे काटेकोरपणे पालन करावे.

उपरोक्त कलम १४ (च) (४) नुसार आपल्या संस्थेने प्राधिकरणाने निर्धारित केलेले शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे शुल्क संस्थेच्या सूचना फलकावर आणि संकेतस्थळावर प्रदर्शित केल्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयात [illegible] दिवसांच्या आत सादर करावा. सदर मुदतीत अनुपालन अहवाल सादर न केल्यास कायद्याच्या कलम २० नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

डॉ.अर्जुन चिखले, भा.प्र.से
सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण
मुंबई